# प्रेस नोट

## <u>शेगांव येथील धाडसी घरफोडीची स्थानिक गुन्हे शाखे कडून यशस्वी उकल,</u>
## <u>11 आरोपी अटक, तर हिरे जडीत सोने, चांदी, नगदी असा एकूण 40,31,981/-रुपयांचा मुद्देमाल जप्त.</u>

1. **गुन्ह्याची हकीकत** :- दि.16/01/2023 रोजी **पो.स्टे. शेगांव शहर** येथे फिर्यादी आनंद पालडीवाल रा. शेगांव यांनी फिर्याद दिली की, त्यांचे आईचे डोळ्याचे ऑपरेशन करणेकामी जालना येथील नेत्र रुग्णालय येथे गेले असता दि. 15/01/2023 चे 10/30वा. ते दि.16/01/2023 चे 13/30वा. सुमारास अज्ञात आरोपीतांनी त्यांचे राहते घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून, घरात प्रवेश करुन, घरातून **नगदी कॅश 25 लाख रुपये, सोन्याचे-हिऱ्यांचे 1400 ते 1500 ग्रॅम वजनाचे दागीने किं. 65 लाख रुपये, चांदीचे भांडे ईतर वस्तू कि. 2.50 लाख रुपये, असा एकूण 92,50,000/-रुपयांचा मुद्देमाल चोरुन नेला**. अशा रिपोर्टवरुन पो.स्टे. शेगांव शहर येथे गु.र.नं. 20/2023 कलम 454, 457, 380 भादंवि प्रमाणे गुन्हा दाखल करुन तपासात घेण्यात आला. गुन्ह्याचे तपासामध्ये फिर्यादी यांनी दिलेल्या जबाबावरुन सदर गुन्ह्यात नगदी 12,50,000/-रुपये व सोने व हिऱ्याचे दागीने अं.700 ग्रॅम किं.अं.35,50,000/-रुपयांचे, चांदीच्या वस्तु अं.1700 ग्रॅम किं.2,00,000/-रु.चा तसेच घरातील ईतर वस्तु अं.16,000/-रुपयांचा असा <u>**एकूण 50,16,000/-रुपयांचा**</u> मुद्देमाल चोरी गेला असल्याचे तपासात निष्पन्न झाले.
2. सदरची चोरी ही बुलढाणा जिल्ह्यात आज पावेतो घडलेल्या चोरीच्या घटनेतील सर्वात मोठी चोरी आहे. गुन्ह्याची गंभीरता आणि त्यामुळे परिसरात झालेले भितीचे वातावरण यामुळे सदरचा गुन्हा उघड करुन, आरोपीतांचा शोध घेवून, गुन्ह्यात गेलेला मुद्देमाल हस्तगत करण्याचे पोलीसासमोर आव्हान होते.
3. सदर गुन्ह्याचे तपासामध्ये मा.पोलीस अधीक्षक श्री. सारंग आवाड, मा.श्री.अशोक थोरात-अपर पोलीस अधीक्षक खामगांव, मा.श्री. बाबुराव महामुनी-अपर पोलीस अधीक्षक, बुलढाणा, मा.श्री. अमोल कोळी- उपविभागीय पोलीस अधिकारी खामगांव यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. श्री. अशोक ना. लांडे स्था.गु.शा. बुलढाणा, पोनि. अनिल गोपाळ पो.स्टे. शेगांव शहर यांचे नेतृत्वात आरोपीतांची ओळख आणि त्यांचा मार्ग निश्चीत करण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखा बुलढाणा येथील सपोनि. श्री. मनिष गावंडे, विलासकुमार सानप, अमित वानखडे, पोउपनि. श्री. सचिन कानडे, श्रीकांत जिंदमवार व पोलीस स्टॉप तसेच पो.स्टे. शेगांव शहर येथील पोउपनि. श्री. राहूल काटकाडे, नितीन इंगोले आणि पोलीस स्टॉप यांची पथके तयार करुन आरोपीचा शोध घेण्यासाठी तात्काळ रवाना करण्यात आले. तसेच **सीसीटीव्ही फुटेज, सायबर तांत्रिक विष्लेशनकामी पथक नियुक्त करण्यात आले**.
4. गुन्ह्याचा सुरु असलेल्या तपासामध्ये सायबर पो.स्टे. बुलढाणा यांचे कडून प्राप्त झालेल्या तांत्रीक माहिती वरुन आरोपी (1) **वैभव नंदु मानवतकर वय-26 वर्षे रा. सोनाटी ता. मेहकर** याचा शोध घेवून, त्यास नाशिक येथून त्यास ताब्यात घेवून, अटक करण्यात आली. त्याने गुन्ह्याची कबुली दिल्यावरुन स्थानिक गुन्हे शाखा-बुलढाणा यांचे विशेष पथकाने आरोपी (2) **मुंजा तुकाराम कहाते वय-20 वर्षे (3) प्रितम अमृतराव देशमुख वय-29 वर्षे रा. प्रिंपी देशमुख ता.जि. परभणी** यांना **परभणी** जिल्ह्यातून अटक केली. नमुद आरोपीतांना करण्यात आलेल्या सखोल विचारपूस दरम्यान त्यांनी गुन्ह्यातील **मुख्य आरोपीतांचे** नावे सांगीतली. त्या प्रमाणे आरोपी **(4) अजिंक्य दिगंबर जगताप वय- 27 वर्ष रा. पुंगळा ता. जिंतुर** यास परभणी जिल्ह्यातून तर (5) **नवनाथ विठ्ठल शिंदे वय-19 वर्षे रा. गंगाखेड जि. परभणी** यास **चाकण जि.पुणे** येथून अटक करण्यात आली. (6) **कैलास लक्ष्मण सोनार वय 24 वर्ष रा. जेलरोड, नाशिक** यास नाशिक शहरातून, (7) **मयुर राजु ढगे वय 22 वर्ष,रा. निफाड** यास निफाड येथून, (4) **सौरभ राजु ढगे, वय 26 वर्ष रा ,निफाड, (9) सुजीत अशोक साबळे,वय 27 वर्ष रा.खडक मालेगाव ता निफाड** यांना लोणावळा येथून तर **(10) प्रविण दिपक गागुर्ड वय 28 वर्ष रा. सातपुर नाशिक** यास नाशिक शहरातून आणि (11) **सौ. पुजा प्रविण गागुर्डे वय 29 वर्षे रा. सातपुर नाशिक** यांना नाशिक शहर येथून ताब्यात घेवून अटक करण्यात आली. गुन्ह्यातील अटक आरोपीतांचा वि.न्यायालय, प्रथम श्रेणी न्यायालय, शेगांव येथून वेळोवळी पोलीस कस्टडी रिमांड घेवून तपास करण्यात आला. सध्या गुन्ह्यातील आरोपी न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत.
5. सदर गुन्ह्यामधील अटक आरोपी पैकी हे सराईत गुन्हेगार असून, त्यांचे विरुध्द बुलढाणा जिल्ह्यात तसेच यवतमाळ, परभणी, नाशिक, औरंगाबाद व ईतर जिल्ह्यामध्ये **चोरी, जबरी चोरी, खून, घरफोडी** या सारखे गंभीर गुन्हे दाखल आहेत. सविस्तर विवरण येणे प्रमाणे.

| अ.क्रं | आरोपी चे नाव | दाखल गुन्हे | |
|---|---|---|---|
| | | पोलीस स्टेशन | अपराध नंबर व कलम |
| 1 | अजिक्य डिगाबंर जगताप रा. पुगळा ता. जितुर जिल्हा परभणी | सातारा ख औरगाबाद शहर | 476/2018 क 379 भादवी |
| | | | 486/2018 क 394 भादवी |
| | | चंदनजिरा जालना | 385/2018 कलम 394,34 भादवी |
| | | तडकलास परभणी | 195/2018 कलम 302,201 भादवी |
| | | दहीठाणा परभणी | 126/2018 कलम 394 भादवी |
| | | दहीठाण परभणी | 125/20218 कलम 379 भादवी |
| | | परळी बिड | 315/2017 कलम 379 भादवी |
| | | कदीम जालना | 272/2017 कलम 379 भादवी |
| | | परतुर जालना | 192/2017 कलम 379 भादवी |
| | | वजीराबाद नांदेड | 190/2017 कलम 379 भादंवि. |
| 2. | नवनाथ विठ्ठल शिंदे रा. गंगाखेड परभणी | गंगाखेड परभणी | 346/2022 कलम 457, 380 ,511,34 भादंवि |
| | | गंगाखेड परभणी | 48/2021 कलम 394,395 भादंवि |
| | | गंगाखेड परभणी | 493/2020 कलम 354 ड सह 12 पोस्को |
| | | गंगाखेड परभणी | 81/2020 कलम 307,323,504 भादंवि |
| | | गंगाखेड परभणी | 425/2018 कलम 323,324,504,34 भादंवि |
| 3. | मुंजा तुकाराम कहाते रा. औरंगाबाद | शेगांव शहर | 20/2023 कलम 454, 457,380 भादंवि |
| | | सातारा ख.औरंगाबाद शहर | 486/2018 कलम 394 भादंवि |
| | | दही ठाणा, परभणी | 126/2018 कलम 394 भादंवि |
| | | दहीठाणा, परभणी | 125/2018 कलम 379 भादंवि |
| 4. | वैभव नंदू मानवतकर रा. मेहकर | शेगांव शहर | 20/2023 कलम 454,457,380 भादंवि |
| | | सातारा ख.औ.बाद शहर | 486/2018 कलम 394 भादंवि |
| | | सातारा ख औ.बाद शहर | 376/2018 कलम 379भादंवि |
| | | चंदनजिरा, जालना | 385/2018 कलम 394,34 भादंवि |
| | | तडकलास, परभणी | 195/2018 कलम 302,201,394 भादंवि |
| 5. | सौरव राजू ढगे रा. निफाड | गंगाखेड, परभणी | 346/2022 कलम 457,380,511,34 भादंवि |
| | | गंगाखेड, परभणी | 48/2021 कलम 394,395 भादंवि |
| | | गंगाखेड परभणी | 493/2020 कलम 354भादंवि सह 12 पोस्को. |
| | | आसेगांव, परभणी | 28/2019 कलम 454,380 भादंवि |
| | | खामगावं शहर | 422/2018 कलम 457,380 भादंवि |
| | | गंगापूर नाशिक | 278/2017 कलम 454,457,380 भादंवि |
| | | इंदिरानगर, नाशिक | 247/2017 कलम 454,457,380 भादंवि |
| | | इंदिरानगर, नाशिक | 223/2017 कलम 457,380 भादंवि |
| | | निफाड, नाशिक | 203/2016 कलम 457,380 भादंवि |
| | | निफाड, नाशिक | 01/2016 कलम 379, भादंवि |
| | | निफाड, नाशिक | 149/2014 कलम 457,380 भादंवि |
| | | देवलाली कॅम्प, नाशिक | 66/2014 कलम 379 भादंवि |
| | | निफाड, नाशिक | 129/2013 कलम 461,380 भादंवि |
| 6. | मयुर राजू ढगे रा. निफाड नाशिक | राहूरी अहमदनगर | 463/2022 कलम 25 आर्म ॲक्ट |
| | | अंबड नाशिक | 459/2021 कलम 294,452 भादंवि |
| | | निफाड नाशिक | 574/2021 कलम 325,341 भादंवि |
| | | निफाड, नाशिक | 369/2020 कलम 379, 34 भादंवि |
| | | घोटी, नाशिक | 374/2020 कलम 457, 380 भादंवि |
| | | निफाड, नाशिक | 368/2020 कलम 454,457,380 भादंवि |
| | | अंबड, नाशिक | 805/2019 कलम 454, 457,380 भादंवि |

| | | | |
|---|---|---|---|
| | | भद्रकाली, नाशिक | 185/2017 कलम 392,34 भादंवि |
| | | निफाड, नाशिक | 129/2013 कलम 461, 380 भादंवि |

6. सदर गुन्ह्यामध्ये अटक करण्यात आलेल्या वरील एकूण 11 आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असून गुन्ह्यातील सदर आरोपीतां कडून गुन्ह्यामध्ये चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी (1)**नगदी**-1,50,730/-**रु**, (2) **हिरे जडीत सोन्याचे दागीने** 467 **ग्रॅम कि**.37,43,351/-**रु**, (3) **चांदी** 1600 **ग्रॅम** 1,02,182/-**रु. व ईतर मुद्देमाल असा एकूण** 40 **लाख** 31 **हजार** 981/-**रुपयांचा** मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच पुढील तपासात एक फरार आरोपी याचा शोध घेवून अटक करुन गुन्ह्यातील उर्वरीत मुद्देमालाचा शोध घेणे सुरु आहे.
7. सदरची कारवाई मा. श्री. सारंग आवाड पोलीस अधीक्षक, बुलढाणा, मा.श्री.अशोक थोरात-अपर पोलीस अधीक्षक खामगांव, मा.श्री. बाबुराव महामुनी-अपर पोलीस अधीक्षक बुलढाणा, मा.श्री. अमोल कोळी- उपविभागीय पोलीस अधिकारी खामगांव यांचे मार्गदर्शनाखाली पोनि. श्री. अशोक ना. लांडे स्था.गु.शा. बुलढाणा, पोनि. अनिल गोपाळ पो.स्टे. शेगांव शहर, सपोनि. श्री. मनिष गावंडे, विलासकुमार सानप, अमित वानखडे, पोउपनि. श्री. सचिन कानडे, श्रीकांत जिंदमवार, पोहेका. दिपक लेकुरवाळे, पोना. गणेश पाटील, पुरुषोत्तम आघाव, गजानन दराडे, युवराज राठोड, राजकुमार राजपूत, सतीश हाताळकर, गणेश शेळके, विजय वारुळे, प्रविण पडोळ, दिगंबर कपाटे, पोकॉ. जयंत बोचे, गजानन गोरले, वैभव मगर, मपोकॉ. अनुराधा उगले, सरीता वाकोडे, चापोना. राहूल बोर्डे, रवि भिसे आणि पोलीस स्टाफ स्था.गु.शा.बुलढाणा, पोहेकॉ राजू आडवे, पोकॉ. कैलास ठोंबरे पो.स्टे. सायबर बुलढाणा, तसेच पोउपनि. श्री. राहूल काटकाडे, नितीन इंगोले, पोहेकाँ. गजानन वाघमारे, पोना गणेश वाकेकर, राहूल पांडे, पोकॉ. विजय साळवे, प्रकाश गव्हांदे, मपोकॉ. वंदना वारे, शितल खपाटे पो.स्टे. शेगांव शहर यांनी केली.

दि.28/02/2023
पो.स्टे. शेगांव शहर.

**पोलीस अधीक्षक,**
**बुलढाणा**